SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE:EPABX-2609000. AffiliationT1 Section-0231-2609089. 2609146
Web : www.unishivaji.ac.in Email: affiliationt1@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - इपीबीएक्स - २०६०९०००, संलग्नता टी.१ विभाग : ०२३१- २६०९०८९. २६०९१४६
वेबसाईट : www.unishivaji.ac.in ईमेल : affiliationt1@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52

एसयु/संलग्नता/स्थान/टे.१/एकेके / 1656 दिनांक 20 SEP 2025

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व कला, वाणिज्य, विज्ञान, शारीरिक शिक्षण,
शिक्षणशास्त्र, विधि, महाविद्यालये.

विषय:- **महाविद्यालयीन शिक्षकांची ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार वरिष्ठ श्रेणी / स्टेज २ (AL ११), निवड श्रेणी /स्टेज ३ (AL १२), स्टेज-४ AGP ९००० व स्टेज-५ AGP १०००० स्थाननिश्चितीसाठी 'एम.फिल. अर्हताधारक शिक्षकांना नेट सूट - विशेष शिबीर' आयोजनाबाबत.**

संदर्भ:- मा.उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांचे क्र.संकीर्ण-२२०४/प्र.क्र.९१/विशि-१ दि.१८/०७/२०२५

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयासंदर्भात आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या समितीच्या शिफारशीनुसार दि.११/०७/२००९ पूर्वी एम.फिल. पदवी पूर्ण केलेल्या आणि दि.१४ जून, २००६ रोजी किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या नियमित/कायमस्वरुपी सेवेत असल्याने शिक्षकांना राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET) परीक्षेमधून सूट देण्यात आलेली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.०२/०७/२०२५, शासनपत्र दि.१८/०७/२०२५ व संचालनालयाच्या दि.२२/०७/२०२५ रोजीच्या पत्रास अनुसरुन, विद्यापीठ कार्यालयामार्फत सदरचे पत्र व यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि.०२/०८/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तेव्हा सदर पत्राच्या अनुषंगाने, सदर यादीतील Recommended महाविद्यालयीन शिक्षकांची ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार **वरिष्ठ श्रेणी / स्टेज २ (AL ११), निवड श्रेणी /स्टेज ३ (AL १२), स्टेज-४ AGP ९००० व स्टेज-५ AGP १०००० स्थाननिश्चिती** करण्यासाठी संबंधित शिक्षकांचे प्रस्ताव महाविद्यालयाकडून मागवून घेऊन विद्यापीठामार्फत केंद्रिय पध्दतीने विशेष शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील ज्या शिक्षकांची नांवे उपरोक्त यादीमध्ये Recommended असतील, अशा शिक्षकांनी स्थाननिश्चितीसाठी आवश्यक ते शुल्क भरुन, सर्व आवश्यक ती कागदपत्रे (नियमित मान्यता, चेंजिस इन स्टाफ मान्यतेसह) जोडून प्रस्तावावर **'एम.फिल. अर्हताधारक शिक्षकांना नेट सूट - विशेष शिबीर'** असा स्पष्ट उल्लेख करुन, दिनांक **३० सप्टेंबर, २०२५** पर्यंत प्रत्येक स्टेजचे स्वतंत्र प्रस्ताव प्राचार्यांमार्फत सादर करावेत.

सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.

कळावे,

आपला विश्वासू

(जी. आर. पळसे)
उपकुलसचिव
संलग्नता टी.१ विभाग